Vol III Issue VIII May 2014
ISSN No : 2249-894X

## *Monthly Multidisciplinary Research Journal*

# *Review Of Research Journal*

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal University of Rondonia, Brazil

Catalina Neculai
University of Coventry, UK

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA
UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.ror.isrj.net**

Review Of Research
Vol. 3 | Issue. 8 | May. 2014
Impact Factor : 2.1002 (UIF)
ISSN:-2249-894X
Available online at www.ror.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# बालकाच्या सर्वांगीण विकासात पालकांची भूमिका

मीनाक्षी तडस

गृहअर्थशास्त्र विभागप्रमुख , एस.एस.जायस्वाल कॉलेज, अर्जुनी / मोर. जि. गोदिया.

**सारांश :**

आधुनिक विज्ञानयुगात जीवन हे पूर्वीसारखे सरळ व संथ राहिलेले नाही. ते अतिशय गतिमान आणि परिवर्तनशील झाले आहे. जीवनाच्या सर्वच क्षेत्रात, आचारविचारात बदल वेगाने घडून येत आहे. त्यामूळे राहणी,विचारसरणी,परंपरा, मूल्ये या सर्वच बाबतीत जुनी पिढी नवीन पिढी यात सांस्कृतिक संघर्ष निर्माण होत आहे. या संघर्षाचे प्रतिबिंब अनेक कुटुंबातून पडलेले दिसून येते. वडिलधा—यांना नवे विचार आणि कल्पना सहसा पटत नाहीत तर तरुण परंपरावादी विचारसरणी जीर्ण व प्रतिगामी वाटते. मुलांचे विचार अपरिपक्व असतात. त्याच्यात विवेक नसतो, उथळपणा असतो. परंतु मुले ही समाजाचेच अनुकरण करीत असतात. त्यांचे आदर्श बदलत असतात. कौटुंबिक नीतीचे ते जरी उल्लघंन करीत असले तरी सामाजिक नीतीचे आदर्श त्यांच्यासमोर असतात. अशा परिस्थितीत जुन्या व नव्याचे मुलांसोबतच मूल्यमापनही करता येईल. हया दृष्टीने मुलांना पालकांनी मार्गदर्शन करावे. बदलत्या काळाला अनुकूल असे सामाजिक समायोजन साधण्याकरिता त्यांना सहकार्य द्यावे. स्वत्वाची जाणीव, जिव्हाळा, प्रेम व सुरक्षितपणाची भावना या मुलांच्या मूलभूत गरजांची पूर्ती आईवडीलांकडून होणे आवश्यक असते. ज्या कुटुंबात मुलांच्या हया गरजांची पूर्तता होते, अशा कुटुंबामधील मुले पुढील जीवनातील वादळाला व अशांततेच्या काळाला यशस्वीपणे तोंड देऊ शकतील.

## प्रस्तावना :

विवाह करुन कुटुंबाची निर्मिती करणे हे प्रत्येक धर्मात प्राथमिक कर्तव्य मानले गेले आहे. बालकांचे संगोपन ही एक शास्त्रीय प्रकिया आहे. बालकाचा शारीरिक, मानसिक, बौध्दिक, नैतिक सामाजिक आणि भाषा विकास म्हणजेच सर्वांगीण विकास होय. बालकाचा सर्वांगीण विकास योग्य व्हावा यासाठी लग्नाआधीपासूनच भावी मातेने आपले आरोग्य चांगले राहील याची काळजी घेतली पाहिजे. लग्नानंतर गर्भधारणेचा काळ हा ओझं न समजता (त्यावेळी होणा—या त्रासांमुळे) आनंदाने त्याचा स्वीकार करावा. गर्भात होणा—या बाळाच्या हालचालींचा पती—पत्नी दोघांनीही आनंद घ्यावा. गर्भाबद्दल स्त्रियाच्या मनात प्रेम असेल तर शांत बाळ जन्माला येते. गर्भावरुन प्रेमाने हात फिरविला तर गर्भाच्या वाढीवर त्याचा सकारात्मक परिणाम होतो हे शास्त्रीयदृष्टया सिध्द झाले आहे. यालाच स्पर्शचिकित्सा म्हणतात.

## ऐतिहासिक संदर्भ —

आपल्या प्राचीन ग्रंथात गर्भावस्थेत स्त्रीने काय करावे, काय करु नये, काय खावे, काय खाऊ नये याबद्दल सविस्तर माहिती मिळते. म्हणजेच आधीपासूनच आपल्या पूर्वजांना गर्भाच्या विकासावर कोणकोणते घटक कसे प्रभावी किंवा घातक ठरतात याची माहिती होती. यातील एक सुपरिचित कथा अशी की, श्रीकृष्णाने आपली बहिण सुभद्रेला ती गर्भवती असताना चक्रव्यूह भेदण्याचा मार्ग सांगितला. परंतू काही कारणास्तव बाहेर पडण्याचा मार्ग तो सांगू शकला नाही. सुभद्रेने अभिमन्यूला जन्म दिला. जेव्हा महाभारत घडले त्यावेळी अभिमन्यू चक्रव्यूहाला भेदून आत गेला. कारण गर्भात असतांना त्याने आत कसे जावे हे ऐकले होते. परतु बाहेर पडण्याचा मार्ग न ऐकल्यामुळे तो तिथेच धराशायी

झाला.यात खरोखर असे घडले होते का? हा प्रश्न महत्वाचा नाही. तर कवीने हे महाकाव्य लिहिले तेव्हा त्यांना हे माहिती होते की गर्भस्थ शिशूवर आपल्या वागण्या–बोलण्याचा परिणाम होतो.आधूनिक काळात हे शास्त्रानेसुध्दा मान्य केले आहे

गर्भ 4–5 महिने वाढल्यावर जर विशिष्ट वेळी एखादे विशिष्ट संगीत आईने ऐकले तर मुलाने जन्म घेतल्यानंतर हे संगीत सुरु केले असता तो एकचित्त होऊन हे संगीत ऐकतो. कितीही रडत असला तरी शांत होतो.

***गर्भावस्थेतील आहार –***

स्त्री गर्भवती असताना तिची मानसिक अवस्था नाजूक झालेली असते. अशावेळी पतीची भूमिका महत्वपूर्ण ठरते. तिला मानसिक आधार देणे, समजून घेणे फार महत्वाचे असते. याचा सकारात्मक परिणाम बाळाच्या वाढीवर होतो. बाळ जन्माला आल्यानंतरही बाळाला सांभाळणे ही फक्त आईची जबाबदारी आहे असे न समजता वडिलांनीही बाळाच्या पालनपोषणात वाटा उचलावा. स्त्रीवर घरातील जबाबदारी असते. पुन्हा बाळ एक वर्षाचे होईपर्यंत त्याकडे रात्रंदिवस लक्ष द्यावे लागते. जर अशावेळी तिला पतीचे आणि घरातील इतर सदस्यांचे सहकार्य मिळाले नाही तर अतिपरिश्रमामुळे तिला शारीरिक आणि मानसिक व्याधी जडू शकतात.

***योग्य सवयी व संगोपन –***

मुलांना स्वावलंबी बनविण्यासाठी स्वतःची कामे स्वतः व्यवस्थित लावून ठेवणे, बूट घालणे, कपडे काढणे–घालणे, जेवणाची भांडी ठेवणे, खरकटी भांडी उचलणे, अशा सवयी मुलगा व मुलगी दोघांनाही लावायला हव्यात. शिक्षणाच्या निमित्ताने मुलेसुध्दा बाहेरगावी राहतात. तेव्हा त्यांची तारांबळ उडू नये म्हणून थोडीफार घरकामाची आणि स्वयंपाकाची सवय मुलांना हवीच. तसेच मुलींना बाहेरची कामेही यायला हवीत. मुलांना जर अतिसंरक्षण दिले तर ती कधीच स्वावलंवी बनू शकत नाहीत. परावलंबी, भित्री, माघारी फिरणारी अशा वृत्तीची होतात. हे सर्व टाळण्यासाठी मुलांना निरनिराळी कामे स्वतंत्रपणे करण्यास प्रोत्साहन व संधी दिली पाहिजे. मुलगा व मुलगी यात भेदाभेद करु नये.

मूल जेव्हा बोलायला लागते तेव्हा ते बोबडे बोलते आपल्याला त्याची मजा वाटते. म्हणून आपणही त्याच्याशी बोबडेच बोलतो. खरे उच्चार त्याच्या कानावर पडत नाहीत आणि यामुळे उच्चार सुधारण्याची संधी त्याला मिळत नाही. अशा मुलांना त्याची मित्रमंडळी चिडवतात. यामुळे त्याचात न्यूनगंड निर्माण होतो आणि तो इतरांमध्ये न मिसळता एकटाच राहणे पसंत करतो. म्हणून मुलांशी बोलतांना पालकांनी लहान न होता मोठयांसारखेच बोलायला हवे.

कुटुंबाची आर्थिक परिस्थिती चांगली असल्यास मुलांांना अधिक खेळणी, सोयी, संधी उपलब्ध होतात. परंतू याचा अतिरेक होणार नाही याची दक्षता घ्यायाला हवी. मुलांचे सामाजिक समायोजन नीट व्हावे, त्यात अडचणी निर्माण होऊ नये म्हणून मुलांच्या हट्टाला लहानपणीच मुरड घालणे शिकविले पाहिजे.

घरी जर मुलांचे सर्वच हट्ट पूर्ण होत असतील तर शाळेत किंवा समाजात वावरताना घरच्यासारखीच विशेष / खास वागणूक मिळायला हवी असा त्याचा आग्रह असतो, असे न घडल्यास तो मित्रांमध्ये, लोकांमध्ये न मिसळता एकटा राहतो किंवा मग आक्रमक बनतो. घरातसुध्दा पालकांना स्वतःच्या म्हणण्यानुसार नाचवतो. अशी मुले मग हाताच्या बाहेर गेल्यावर पालकांच्या हाती पश्चात्ताप करण्याव्यतिरिक्त काहीही राहत नाही. त्याकरीता पालकांनी मुलांना शिस्त लावण्याकरिता आवश्यक असलेली कडक वागणूक आणि प्रेम याचा सूवर्णमध्य साधणे मुलांच्या भावी आयुष्याच्या दृष्टीने महत्वाचे असते.

***प्रामाणिकतेचे महत्व –***

मुले शाळेतून आपल्या मित्रांच्या आवडलेल्या वस्तू आणतात. तेव्हा चोरी म्हणजे काय?हे त्यांना समजत नाही. फक्त पाहिजे म्हणून तो जी वस्तू उचलून घेतो. पहिल्यांदा असे झाल्यास मुलाला ती वस्तू परत करायला सांगून असे करणे चांगले नाही हे त्याला पटवून द्यायला हवे. मुलांना खोटे बोलू नये असे सांगताना आपण मुलांसमोर कसे वागतो याचे विश्लेषण पालकांनी केले पाहिजे. घरी आलेल्या व्यक्तीला टाळायचे असेल तर वडील मुलाला सांगतात 'जा. त्याला जाऊन सांग. पप्पा घरी नाहीत' अशाने मुलाला सत्याचे महत्व कसे कळणार?म्हणून पालकांनी मुलांसमोर आदर्श पध्दतीनेच वागायला हवे तरच मुलांमध्ये नैतिकतेचा विकास होईल.

आधुनिक पालकवर्गाचा विचार करता बालमानसशास्त्राचे ज्ञान असलेल्या मुलांच्या विकासाकडे लक्ष देत असलेला आढळतो. कुटुंबातून मुलांच्या छंदाची जोपासना केली जाते. सर्व दृष्टीने मुलांना अनुभवसमृध्द करण्याचे प्रयत्न पालकाकडून केल्या जाताना दिसून येते. येथे एक गोष्ट नमूद करायची म्हणजे काही पालक आपल्या मुलांच्या अभ्यासावर इतका भर देतात की त्याला खेळणे किंवा इतर आवडीच्या गोष्टी करु देत नाहीत. तर काही पालक आपल्या मुलानी सर्वच क्षेत्रात टॉपवर रहावे म्हणून आग्रही असतात. या दोन्ही भूमिका टोकाच्याच. त्याचप्रमाणे आपल्या आवडीचे क्षेत्रच मुलाने निवडायला हवे याचे बंधन पालकांनी टाकू नये. त्यांची त्या क्षेत्रातील रुची आणि गती लक्षात घ्यावी. लहानपणी त्याला अभ्यासाची गोडी लागावी म्हणून 'तुला डॉक्टर व्हायचे आहे ना?मग खूप अभ्यास कर म्हणणे ठीक

आहे. कारण त्यावेळी इतर व्यवसायाबद्दल मुलांना माहिती नसते. जन्मल्यापासून डॉक्टर त्यांना ओळखीचे असतात. डॉक्टरांना सर्व खूप मान देतात हे त्यांना कळते. परंतु मूल 10—12 वर्षाचे झाल्यानंतरदेखील त्याचा ओढा कशाकडे आहे हे न पाहता आपल्या इच्छा त्याच्यावर लादल्या वर तो अयशस्वी होण्याचीच जास्त शक्यता असते.

मेरीटमध्ये आल्यानेच व्यक्ती यशस्वी ठरते काय? याचे उत्तर 'नाही' असेच येईल. जर असे झाले असते तर आज समाजात मेरीट आलेल्या व्यक्तीचे वर्चस्व दिसले असते. पण फक्त अभ्यासात हुशार असल्याने आयुष्यात यशस्वी होता येत नाही. तर योग्य व्यक्ती घडण्याने व्यक्ती यशस्वी होते. समाजात डॉक्टर, इंजिनियर याशिवाय इतरही क्षेत्रातील लोकांची गरज असते. म्हणून पाल्यांना त्याच्या आवडीच्या क्षेत्रात पुढे येऊ द्या. यामधूनच एखादे मूल बाबा आमटे, किरण बेदी, एखादा सचिन, एखादी सानिया आपल्या घरातून पुढे येईल.

शेवटी पालकांची इच्छा एकच असते की आयुष्यात आपल्या मुलांनी आपल्या पुढे जावे. मुले मोठी झाल्यावर त्यांच्या नावाने आपल्याला ओळखले जावे. समाजजीवनात आपले मूल जेव्हा प्रवश करेल जेव्हा त्याच्या प्रवेशाने उमटलेले पाऊल हे मानवाचे असेल, दानवाचे नव्हे. यासाठी आईवडिलांनी आपली पालकाची भूमिका जाणीवपूर्वक पार पाडण्याचे आव्हान स्विकारणे ही काळाची गरज आहे.

संदर्भसूची —

1.पोषण आणि आहारशास्त्र—त्रिवेणी फरकाडे, सुलभा गोंगे पिंपळापूरे पब्लिशर्स, नागपूर
2)आहारशास्त्राची मूलतत्वे—प्रा. डॉस्नेहा महाजनी,मंगेश प्रकाशन,नागपूर
3)तारुण्याचा उंबरठयावर—डॉ. विठ्ठल प्रभू
4)वैकासिक मानसशास्त्र—डॉ. रा.रा. बोरुडे
5)Today's Young & Their -9 ऑगस्ट 2011 Lifestyle "Future" P.P.1
6)लोकसत्ता दैनिक वर्तमानपत्र—21 एप्रिल 2012 पान. 1,3
7)मुलांवरचे संस्कार —शं. व्य. काश्यप
8)कळी उमलतांना —डॉ. स्मिता धारण

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.ror.isrj.net